महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

===================================================================

जा.क्र.तंशिविकापू/विवि/२०२०-२१/ 22 दिनांक : 04 JAN 2021

**परिपत्रक**

प्रति,
संचालक/प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था,

विषय :- "माझी वसुंधरा # Epledge" अंतर्गत दिनांक १ जानेवारी,२०२१ पासून हरित शपथ घेण्याबाबत,

संदर्भ :- १. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र १६/आस्था/संकीर्ण/२०२१/३ दिनांक १/१/२०२१
२. शासनाचे पत्र क्र मावअ २०२०/प्र.क.८ /संचालनालय, दिनांक २९/१२/२०२०

उपरोक्त विषयाच्या संदर्भाकिंत पत्रास अनुसरुन या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्थांना सुचित करण्यात येते की, "माझी वसुंधरा # Epledge" अंतर्गत दिनांक १ जानेवारी,२०२१ ते १५ जानेवारी २०२१ या कालावधीत संदर्भ क्र २ च्या शासन परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे हरितशपथ घेण्याबाबतच्या या कार्यालयास सुचित केलेले आहे.

वसुंधरेप्रती आपली जबाबदारी म्हणून प्रत्येक संस्थेतील अधिकारी /कर्मचा-यांनी पर्यावरण रक्षणासाठी आपला सहभाग नोंदवावा सदर हरित शपथ https://majhivasundhara.in या वेब पोर्टलवर #Epledge येथे क्लिक करुन ग्रुपने अथवा वैयक्तीकरित्या घेता येईल . यासाठी दिनांक १ जानेवारी,२०२१ ते १५ जानेवारी २०२१ या कालावधीत "हरितशपथ" (Eearth Pledge म्हणजेच # Epledge) घेवून त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी.

केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा जेणेकरुन सदर अहवाल वरिष्ठ कार्यालयास सादर करणे श्क्य होईल.

सोबत :- संदर्भिय पत्र

आपला विश्वासू,
(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

महाराष्ट्र शासन

**तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य**

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी क्र.०२२-68597436,

ई-मेल–desk16@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in


ईमेलव्दारे

पत्र क्रमांक : 16/आस्था/संकीर्ण/2021/3
दिनांक : १।१।२०२१

प्रति,

1) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

2) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

विषय : "माझी वसुंधरा #Epledge" अंतर्गत दिनांक 1 जानेवारी, 2021 पासून हरित शपथ घेण्याबाबत.

उपरोक्त विषयाबाबतचे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक मावअ 2020/प्र.क्र.8/संचालनालय, दिनांक 29.12.2020 सोबत जोडत आहे.

सदर प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील संस्था / कार्यालये यांना उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने हरितशपथ (Earth Pledge म्हणजेच #Epledge) घेण्याबाबतच्या सूचना आपल्या स्तरावरून देण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास पाठवावा जेणेकरून शासनास सादर करणे शक्य होईल.

( प्रमोद नाईक )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : कार्यासन क्रमांक 12, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

मनीषा पाटणकर म्हैसकर, भा.प्र.से.
प्रधान सचिव

पर्यावरण व वातावरणीय
बदल विभाग,
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई -४०००३२

# माझी वसुंधरा अभियान

क्रमांक:मावअ २०२०/ प्र.क्र.८/ संचालनालय
दिनांक: २९ डिसेंबर, २०२०

**विषय : "माझी वसुंधरा #Epledge"अंतर्गत दिनांक १ जानेवारी, २०२१ पासून हरित शपथ घेण्याबाबत.**

**महोदय,**

पृथ्वी, वायू, जल, अग्नी, आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांसोबत जीवन पद्धती अंगीकारल्याशिवाय आपण निसर्गासोबत जगू शकणार नाही आणि जैवविविधतेचेही अस्तित्व राहणारनाही. यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग,राज्यातील इतर विभाग, इतर राज्ये, केंद्र, अशासकीय संस्था, पर्यावरणवादी आणि राज्यातील प्रत्येक नागरीक यांच्यासह एकत्रितपणे कार्यकरीतआहे.याचाच एक भाग म्हणून निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित **"माझी वसुंधरा अभियान"** हे राज्यातील नागरी स्थानिक स्वराज संस्थांमध्ये व पंचायतराज संस्थांमध्ये राबविण्यास सुरवात झाली आहे. याबाबतच्या शास निर्णयाची प्रत सुलभ संदर्भासाठी *जोडपत्र-१* म्हणून सोबत जोडली आहे.

२. वसुंधरेप्रती आपली जबाबदारी म्हणून राज्यातील प्रत्येक नागरीकांनी पर्यावर रक्षणासाठी आपला सहभाग नोंदवावा यासाठी दिनांक १ जानेवारी, २०२१ ते १५ जानेवा २०२१ या कालावधीत "हरितशपथ"(**Earth Pledge म्हणजेच #Epledge**) घेण्या मोहिम राबविण्यात येणार आहे. या कालावधीत राज्यातील प्रत्येक नागरीकांनी "हरितशप (**Earth Pledge म्हणजेच #Epledge**) घेवून त्याची अंमलबजावणी

करणे अपेक्षित आहे. त्यानुसार, कार्यवाही करण्याच्या सूचना विभाग, जिल्हा, शहर व ग्रामस्तरावरील यंत्रणांना या विभागामार्फत देण्यात आल्या आहेत.

३. मंत्रालय हे राज्य शासनाचे सर्वोच्च कार्यालय असल्याने मंत्रालयामधील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनीही पर्यावरणाच्या रक्षणासाठी "हरित शपथ" (**Earth Pledge** म्हणजेच **#Epledge**) घेवून त्याची अंमलबजावणी केल्यास, त्यामुळे राज्यातील इतर नागरीकांनाही प्रोत्साहन मिळेल व पर्यावरणाच्या रक्षणाप्रती मदत होवू शकेल.

४. सदर हरित शपथ https://majhivasundhara.in या वेब पोर्टलवर **#Epledge** येथे क्लिक करून ग्रुपने अथवा वैयक्तीकरित्या घेता येईल. याबाबतची कार्यपध्दती सोबतच्या सादरीकरणात *जोडपत्र-२* म्हणून जोडली आहे. तरी, दिनांक १ जानेवारी, २०२१ ते दिनांक १५ जानेवारी, २०२१ या कालावधीत आपण स्वत: हरित शपथ घ्यावी. तसेच, आपल्या विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना, त्याचप्रमाणे आपल्या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना "हरितशपथ"(**Earth Pledge म्हणजेच #Epledge**)घेण्याबाबच्या सूचना आपल्या स्तरावरून देण्यात याव्यात हि विनंती.

Warm Regards.

आपली,

(मनीषा पाटणकर-म्हैसकर)

**सोबत : वरील प्रमाणे**

**श्री.आदित्य ठाकरे**
**मंत्री**
पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल,
राजशिष्टाचार

महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई -४०००३२

# माझी वसुंधरा अभियान

**क्रमांक :मावअ २०२०/ प्र.क्र.५/संचालनालय**
**दिनांक :२३ डिसेंबर, २०२०**

**विषय : "माझी वसुंधरा "अभियानांतर्गत दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी हरित शपथ (#Epledge) घेण्याबाबत.**

**संदर्भ** : माझे दिनांक २५ नोव्हेंबर, २०२० चेपत्र.

**महोदय,**

निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित **माझी वसुंधरा अभियानाची** अंमलबजावणी प्रभावीपणे करण्याबाबत सर्व संबंधित यंत्रणांना आदेश देवून या अभियानामध्ये अंतर्भूत असलेल्या विविध घटकांसाठी संबंधित विभागांच्या शासकीय योजनांच्या निधीच्या अभिसरणातून (Convergence) विविध उपक्रम राबविण्याबाबत व जिल्हास्तरावरील आढावा बैठकीत वेळोवेळी आढावा घेवून माझी वसुंधरा अभियानाला गती देण्याबाबत संदर्भीय माझ्या दिनांक २५ नोव्हेंबर, २०२० च्या पत्रान्वये आपणास विनंती करण्यात आली आहे. त्यानुसार, आपण कार्यवाही करीत असालयाची मला खात्री आहे.

२. वसुंधरेच्या प्रती आपली जबाबदारी म्हणून राज्यातील प्रत्येक नागरीकांनी आपला सहभाग म्हणून, दिनांक १ जानेवारी, २०२१ ते १५ जानेवारी, २०२१ या कालावधीत माझी वसुंधरा अभियानांतर्गत पर्यावरण रक्षणाच्या अनुषंगाने "हरितशपथ" (**Earth Pledge** म्हणजेच **#Epledge**) घ्यावयाची आहे. राज्यातील जास्तीत जास्त नागरीकांनी अशी हरित

शपथ घेण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून, आपण पालकमंत्री असलेल्या जिल्हयामध्ये नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी म्हणजे दिनांक १ जानेवारी, २०२१ करोना संबंधातील सर्व प्रोटोकॉल विचारात घेवून छोटासा कार्यक्रम आयोजित करावा त्यामध्ये उपस्थित नागरीकांना नविन वर्षाच्या शुभेच्छा देवून आपण हरित शपथ घ्यावी. अशा प्रकारे घेण्यात आलेल्या हरित शपथेची नोंद www.majhivasundhara.in या वेब पोर्टलवर करण्यात यावी. तसेच, नागरिकांना सदर शपथ ऑनलाईनही घेता येणार आहे. जिल्हयामधील सर्व शासकीय निम-शासकीय संस्था, स्वयंसेवी संस्था, शाळा, महाविद्यालये यांनीही करोना संबंधातील सर्व प्रोटोकॉल विचारात घेवून ग्रुपने अथवा वैयक्तीकरित्या ऑनलाईन हरित शपथ घेण्याबाबत आपण आवाहन करावे, हि विनंती.

आपलास्नेहांकित

(आदित्यठाकरे)

प्रति,
श्री.उदय रविंद्र सामंत
पालकमंत्री,
सिंधुदुर्ग जिल्हा